

| वर्ष - 7 | अंक - 259 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 30 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- विराट-जडेजाला मारण्याची धमकी
- मयुरी देशमुखचा 'लग्नकल्लोळ'
- भाजपचे नवे राजकारण!
- ३,१६,३०० कोटींचे सामंजस्य करार

# मुख्य अभियंता ‘नामधारी’!

## » पदभार वाटपाला मुहूर्त मिळेना : आयुक्त शेखर सिंह यांचा वेळकाढूपणा?

अधिकराव दिवे- पाटील

। पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नव्या सुधारित २०२३ च्या आकृतीबंधात अभियांत्रिकी विभागातील शहर अभियंता या पदाला समकक्ष दर्जाचे मुख्य अभियंता ही दोन पदे निर्माण केली आहेत. त्या पदावर सेवा ज्येष्ठनेतेनुसार सह शहर अभियंता श्रीकांत सवणे आणि रामदास तांबे यांची नियुक्त करण्यात आली. त्याला राज्य सरकारने मंजुरीही दिली. मात्र, प्रशासनातील राजकीय कुरघोड्यांमुळे अद्याप दोन्ही अधिकाऱ्यांना पदभार वाटप करण्यात आला नाही.**



महापालिका कार्यक्षेत्रात झपाट्याने वाढणारी लोकसंख्या तसेच, पालिकेत समाविष्ट झालेल्या गावांचा विचार करता कामाचा वाढला आहे. त्यामुळे पुणे पालिकेच्या धर्तीवर शहर अभियंता यांची वेतनश्रेणी बांधकाम विभागाच्या समकक्ष केली आहेत. वास्तविक, पिंपरी-चिंचवड महापालिका अस्थापनेवरील शहर अभियंता समकक्ष मुख्य अभियंता (प्रोजेक्ट्स) व मुख्य अभियंता (पर्यावरण) या दोन पदांची नव्या पदनिर्मिती व सेवा प्रवेश नियम लागू करण्याबाबत महापालिका सर्वसाधारण सभेत दि. २० सप्टेंबर २०२१ रोजी ठराव मंजूर झाला होता. मात्र, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवला नाही. त्याबाबदल प्रशासकीय दखल घेतली जात नव्हती. आता शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी याबाबत पाठपुरावा सुरू केला. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती.

त्यानंतर नगर विकास विभागाकडून दि. २३ ऑगस्ट २०२३ रोजी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अस्थापनेवरील शहर अभियंता पदांची वेतनश्रेणी तसेच मुख्य अभियंता अभिमानाची पदनिर्मिती, वेतनश्रेणी, प्रमाण आर्हता मंजूर करण्यात आल्याचा आदेश जारी करण्यात आला.

त्यानंतर ऑक्टोबर- २०२३ मध्ये श्रीकांत सवणे आणि रामदास तांबे या दोन अधिकाऱ्यांची या पदावर नियुक्ती करण्यात आली. परंतु, गेल्या ३ महिन्यांपासून हे अधिकारी निव्वळ नामधारी आहेत. त्यांच्याकडील पदभाराची विभागणी अद्याप केलेली नाही.

### अधिकार वाटपासाठी अडचण काय?

» महापालिका मुख्य शहर अभियंता समकक्ष पदनिर्मिती प्रस्ताव महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात रखडला. त्यावर निर्णय घेण्यासाठी महायुती सरकारची वाट पहावी लागली. त्यानंतर पदांना मंजुरी मिळाल्यानंतर अधिकार वाटप आणि कुणाची वर्णी लागणार याबाबत खलबते झाली. संबंधित अधिकाऱ्यांनी नियुक्ती मिळाल्यानंतर आता त्यांच्या अधिकार वाटपाबाबत प्रतीक्षा करावी लागत आहे. राज्यात महायुतीचे सरकार आहे. महापालिकेत प्रशासकीय राजवट आहे. असे असतानाही आयुक्त शेखर सिंह केवळ अधिकार वाटपासाठी विलंब का करीत आहेत, याचे आश्चर्य व्यक्त होत आहे.

### आयुक्तांचा वेळकाढूपणा कशासाठी?

» महापालिका प्रशासकीय कामकाजामध्ये सुसूत्रता यावी. या करिता २०२१ मध्ये सर्वसाधारण सभेमध्ये आकृतीबंधानुसार दोन मुख्य अभियंता पदांची निर्मिती करण्याबाबत प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. त्यावर निर्णय घेण्यासाठी दोन-अडीच वर्षे प्रतीक्षा करावी लागली. अधिकारी नियुक्तीचा निर्णय झाल्यानंतर प्रशासकीय प्रमुख या नात्याने शेखर सिंह यांनी तात्काळ कार्यवायी करणे अपेक्षीत होते. ज्यामुळे सर्व विभागाचे कामकाज गतीमान करता आले असते. पण, भामा आसखेड जॅकवेल, केबल डक्टिंग, वाकडमधील टीडीआर असे अनेक निर्णय स्वत:च्या अधिकारात आणि सडेतोडपणे घेणारे शेखर सिंह मुख्य अभियंता पदाच्या अधिकार वाटपासाठी वेळकाढूपणा करीत आहेत. शहरातील विकासकामे आणि विविध प्रकल्प व योजनांच्या अंमलबजावणीवर होत आहे, अशी चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे.

# नाभिक बांधवांनो, असंघटीत श्रमिक ओळखपत्र घ्या!

## » शंकर जगताप यांचे आवाहन : पिंपळे गुरव येथे ‘हेअर ऍन्ड केमिकल सेमिनार’

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात सर्व असंघटित श्रमीकांना नोंदणी करुन ओळखपत्र देण्याचे काम सुरु आहे. महाराष्ट्र नाभिक महामंडळाशी संबंधित व इतर सर्वच नाभिक समाजातील प्रत्येक व्यक्ती व त्यांच्या कुटुंबातील पाच सदस्यांना नोंदणी करुन घेवून निशुल्क ओळखपत्र दिले जाते. त्याचा फायदा केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी होणार आहे. त्यामुळे नाभिक बांधवांनी महाराष्ट्र नाभिक महामंडळाकडे संपर्क साधून असंघटित श्रमिक म्हणून नोंदणी करून त्याचे ओळखपत्र घ्यावे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.**




लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त महाराष्ट्र नाभिक महामंडळ पिंपरी-चिंचवड शहर व मगेशा ऍकॅडमी के प्लेक्स यांच्या संयुक्त विद्यमाने आज पिंपळेगुरव येथील नटसम्राट निळूभाऊ फुले नाट्यगृहात हेअर ऍण्ड केमिकल सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जगताप बोलत होते.

यावेळी स्किल डेव्हलमेंट मंत्रालय महाराष्ट्र राज्याचे ओ.एस.डी श्रीपाद ढेकणे, महाराष्ट्र नाभिक महामंडळ पिं.चिं. शहराध्यक्ष गणेश वाळुंजकर, विश्वकर्मा योजना जिल्हा संयोजक दत्तात्रेय ढगे, संजय गांधी निराधार योजनेचे संजय मराठे, खजिनदार रविंद्र फूलपगारे, सरचिटणीस सागर आढाव, मुख्य संघटक सचिन सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

### असंघटित कामगारांसाठी विविध योजना...

» शंकर जगताप म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकार असंघटित कामगारांच्या हितासाठी विविध योजना राबवित आहे. मोदी सरकारने महाराष्ट्रासह भारतातील संपूर्ण नाभिक समाज व सलून व्यवसाय करणाऱ्या सर्वांसाठी भारत सरकारच्या ‘नॅशनल करियर सर्व्हिस अंतर्गत मिशन मोड' असंघटित कामगार योजनेला मान्यता दिली आहे. तसेच पंतप्रधानांच्या ‘डिजिटल इंडिया’ या कार्यक्रमाअंतर्गत सलून व्यवसायिकांना काही नियम व अटींच्या आधिन राहून विविध योजनांचा लाभ घेता येतो.

# भाजपा ग्रामपंचायतही जिंकू शकत नाही!

## ईव्हीएम नसेल तर भाजपचा पराभव होईलः संजय राऊत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय जनता पक्षाला निवडणुकांमध्ये मिळालेले यश हे त्यांच्या पक्षाचे नाही, तर त्यांनी ईव्हीएम मशीनमध्ये केलेल्या घोटाळ्याचे यश आहे.परंतु मध्य प्रदेशमध्ये झालेल्या निवडणुकीच्या निकालानंतर माजी खात्री पटली आहे की ईव्हीएममध्ये भारतीय जनता पक्षाने निश्चितच घोटाळा केला आहे आणि त्यामुळेच त्यांना यश मिळाले आहे. जर ईव्हीएम नसेल तर भाजप देशामधील एकही ग्रामपंचायत निवडणूक जिंकू शकत नाही असा विश्वास शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केला.**



जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे आयोजित करण्यात आलेल्या युवा संसदेमध्ये संजय राऊत यांची मुलाखत शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी घेतली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष व युवा संसदेचे अध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर उपस्थित होते.संजय राऊत म्हणाले की, राजकारण करायचे असेल तर मनामध्ये भीती बाळगून चालत नाही. भीती खुंटीला टांगल्याशिवाय राजकारणामध्ये यशस्वी होता येत नाही. राजकारणामध्ये विरोधकांचाही सन्मान केला पाहिजे. ही शिकवण बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला दिली. परंतु सध्या मात्र विरोधकांना संपवण्याचे कटकारस्थान महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात सुरू आहे. या संघर्षामध्ये शिवसेना कायम लढत राहणार आहे. माझ्यावर शिवसेना संपवण्याचे आरोप केले जातात. परंतु जे आरोप करतात तेच लोक शिवसेना सोडून जातात आणि आम्ही मात्र शिवसेना वाचवण्याचे काम गेल्या ४० वर्षांपासून करत आहोत आणि यापुढेही करत राहणार. देशाच्या संसदेमध्ये मी मागील २२ वर्षांपासून खासदार म्हणून काम करत आहे. परंतु गेल्या दहा वर्षांमध्ये संसद लोकशाहीचे मंदिर राहिलेले नाही. तर त्या ठिकाणी केवळ आरडाओरडा करून एकमेकांचे गळे दाबण्याचे आणि लोकशाही संपवण्याचे काम सुरू आहे. देशामध्ये बेरोजगारी वाढत आहे. भ्रष्टाचार वाढत आहे, परंतु या संबंधात बोलणाऱ्यांना तुरुंगामध्ये टाकले जात असल्याचे सांगत संजय राऊत यांनी भाजप नेत्यांवर टीका केली.महाराष्ट्र खड्डयात घालणारेच आज सत्तेमध्ये बसले आहे. अशा लोकांवर थुंकायचे नाही तर काय फुले उधळायची का? एकेकाळी महाराष्ट्र दिल्लीमध्ये ताठ मान करून वावरत होता, परंतु आज मात्र या भ्रष्टाचारी आणि बेईमान लोकांमुळे महाराष्ट्राची मान संपूर्ण देशामध्ये शरमेने खाली गेली आहे. त्यांच्या विरोधातील लढा शिवसेना कायम सुरू ठेवणार आहे, अशी भूमिका संजय राऊत यांनी मांडली.अयोध्येमध्ये श्रीराम मंदिर हे भाजपने उभारलेले नाही, तर सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर मंदिर समितीने हे मंदिर उभारले आहे. परंतु पंतप्रधान मोदी मात्र उपवासाचे नाटक करून देशाची दिशाभूल करत आहेत. देशातील लोकांच्या अंगावर वस्त्र नाही म्हणून महात्मा गांधी तसेच आयुष्यभर वावरले, त्याप्रमाणे नरेंद्र मोदी हे दररोज चटईवर झोपणार आहेत काय? असा सवाल करतानाच ही नौटंकी त्यांनी बंद करावी आणि जनतेच्या मूळ प्रश्नांकडे लक्ष द्यावे, अशा शब्दात संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टोला लगावला.जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे आयोजित करण्यात आलेल्या युवा संसदेमध्ये संजय राऊत यांची मुलाखत शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी घेतली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष व युवा संसदेचे अध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर उपस्थित होते.

### लोकशाही संपवण्याचे काम सुरू

संजय राऊत म्हणाले की, राजकारण करायचे असेल तर मनामध्ये भीती बाळगून चालत नाही. भीती खुंटीला टांगल्याशिवाय राजकारणामध्ये यशस्वी होता येत नाही. राजकारणामध्ये विरोधकांचाही सन्मान केला पाहिजे. ही शिकवण बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला दिली. विरोधकांना संपवण्याचे कटकारस्थान महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात सुरू आहे. या संघर्षामध्ये शिवसेना कायम लढत राहणार आहे. माझ्यावर शिवसेना संपवण्याचे आरोप केले जातात. परंतु जे आरोप करतात तेच लोक शिवसेना सोडून जातात आणि आम्ही मात्र शिवसेना वाचवण्याचे काम गेल्या ४० वर्षांपासून करत आहोत आणि यापुढेही करत राहणार. देशाच्या संसदेमध्ये मी मागील २२ वर्षांपासून खासदार म्हणून काम करत आहे. परंतु गेल्या दहा वर्षांमध्ये संसद लोकशाहीचे मंदिर राहिलेले नाही. तर त्या ठिकाणी केवळ आरडाओरडा करून एकमेकांचे गळे दाबण्याचे आणि लोकशाही संपवण्याचे काम सुरू आहे.

# अमेरिकेत मराठी मुलांना बालभारतीकडून पाठ्यपुस्तके

## 20 टक्क्यांपर्यंत बदल करून देण्याचे अधिकार बालभारतीला

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत मराठी भाषा शिकणाऱ्या पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी बालभारतीतर्फे पाठ्यपुस्तके पुरवली जाणार आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळाला स्थानिक गरजेनुसार आवश्यक असल्यास पाठ्यपुस्तकांमध्ये २० टक्क्यांपर्यंत बदल करून देण्याचे अधिकार बालभारतीला देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार शिक्षक प्रशिक्षणाची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेवर सोपवण्यात आली आहे.**



शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा निर्णय घेतला. उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळ तेथील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी शिकवणे, परीक्षा घेणे, प्रमाणपत्र देण्याचे काम गेल्या नऊ वर्षांपासून करत आहे. त्यामुळे मराठी भाषेची अभिवृद्धी करण्यासाठी या बृहन्महाराष्ट्र मंडळ यांच्याशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या सामंजस्य कराराची अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण विभागांतर्गत विविध कार्यालयांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार उत्तर अमेरिकेतील शाळेतील पाचवीच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांची राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळा मार्फत चालवल्या जात असलेल्या शाळेमधील विद्यार्थ्यांमध्ये प्रसार करणे, त्यांना अभ्यासक्रम, पुस्तक उपलब्ध करून देणे, परीक्षा घेणे, प्रमाणपत्र देणे इत्यादी कामकाजाचा नियमित आढावा घेणे, सनियंत्रण करणे व त्यानुसार आवश्यक नियोजन करणे, योग्य निर्णय घेण्यासाठी समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे.

### गरजेनुसार चर्चासत्र घेतले जाईल

दर महिन्याला समितीची ऑनलाइन बैठक घेऊन कामकाजाचा आढावा घेण्यात येईल. उपक्रमाची उद्दिष्टे साधण्यासाठी गरजेनुसार चर्चासत्र घेतले जाईल. उपक्रमात बदलाची आवश्यकता असल्यास त्याबाबतचे अधिकार शासनाच्या मान्यतेने समन्वय समितीकडून केले जातील. उपक्रमाबाबत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद संचालक हे समन्वय साधणार आहेत.राजू शेट्टी यांनी व्यक्त केले. उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत मराठी भाषा शिकणाऱ्या पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी बालभारतीतर्फे पाठ्यपुस्तके पुरवली जाणार आहेत.

## राष्ट्रीय रोइंग स्पर्धांचा थरार सुरू

# सर्वोत्तम खेळाडूंमध्ये चुरस!

### देशभरातील 470 अव्वल नौकानयनपटूंचा सहभाग

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आशियाई स्पर्धेतील मेन्स पेअर प्रकारातील कांस्यविजेती जोडी बाबूलाल यादव व लेखराम तसेच मेन्स फोर प्रकारातील पुनीत कुमार, जसविंदर सिंग, भीमसिंग व आशिष यांच्या संघाकडे पुण्यातील आर्मी रोइंग संकुलात आजपासून सुरू झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय रोइंग स्पर्धेतील विजेतेपदासाठी सर्वांचे लक्ष राहील. आशियाई स्पर्धेत सिंगल स्कल्समध्ये चौथे स्थान मिळविणारे बलराज पन्वर यांच्यावरही सर्वांचे विशेष लक्ष असणार आहे.**




मिलिटरी इंजिनिअरिंग कॉलेज येथील आर्मी रोइंग नोड येथे सीएमई कमांडंट लेफ्टनंट जनरल ए. के. रमेश, महापालिका अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, अखिल भारतीय रोइंग संघटनेचे खजिनदार नबाबुद्दीन अहमद, आयोजन समितीचे अध्यक्ष कमांडंट ए. एस. कंवर, संयोजन सचिव कर्नल आर. रामकृष्णन यांच्या उपस्थितीत वरिष्ठ गट राष्ट्रीय रोइंग चॅम्पियनशीप स्पर्धेचे उद्घाटन झाले. देशभरातील अव्वल ४७४ खेळाडू विविध गटातील विजेतेपदासाठी या स्पर्धेमध्ये झुंज देत असून देशातील अव्वल २७ संघांमध्ये सर्व्हिसेस स्पोर्ट्स बोर्ड, आर्मी स्पोर्ट्स बोर्ड, तसेच अखिल भारतीय पोलीस दल यांचा समावेश आहे.

लेफ्टनंट जनरल ए. के. रमेश म्हणाले, आर्मी रोईंग नोड येथे ४१ वी सीनियर आणि २५ वी ओपन स्प्रिंट नॅशनल रोइंग चॅम्पियनशिपमध्ये भाग घेण्यासाठी देशभरातून आलेल्या सर्वात उत्साही आणि स्पर्धात्मक नौकानयनपटू (रोअर्स) येथे उपस्थित आहेत ही माझ्यासाठी खरोखरच खूप सन्मानाची आणि आनंदाची बाब आहे. या राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये २७ राज्यांतील सुमारे ४५० रोअर्स विजेतेपदासाठी स्पर्धा करत आहेत. स्पर्धात्मक खेळांनी आपल्या देशात खूप मोठा पल्ला गाठला आहे आणि आशियाई गेम्समध्ये आणि इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील आपल्या कामगिरीवरून हे दिसून येते की आपले खेळाडू जगातील सर्वोत्तम खेळांना आव्हान देण्यास सक्षम आहेत.

#### आर्मी रोइंग नोडमध्ये सहाव्यांदा स्पर्धा...

संयोजन सचिव कर्नल आर. रामकृष्णन म्हणाले, देशाची सेवा करणाऱ्या सेनादलाचे खेळाडू अव्वल असलेल्या रोइंगची राष्ट्रीय स्पर्धा आयोजित करताना आनंद होत आहे. देशभरातील सर्वोत्तम खेळाडू या स्पर्धेसाठी पुण्यात आले असून सलग आर्मी रोइंग नोड येथे स्पर्धेचे आयोजन करताना सीएमईला अभिमान वाटत आहे. सन २००९ मध्ये स्थापना झालेल्या आर्मी रोइंग नोडने सलग तिसऱ्यांदा आणि एकूण सहाव्यांदा ही स्पर्धा आयोजित केली असून २०१४ मध्ये पहिली, २०१७ मध्ये ३६वी आणि नंतर ३७, ३९, ४० व ४१ वी स्पर्धाही येथे पार पडल्याचे आर. रामकृष्णन यांनी नमूद केले. मंगळवारपासून पुरुष व महिला गटातील प्रत्येकी सात गटांमध्ये स्पर्धा रंगणार आहेत.

#### पुरुष गटात 318, तर महिला गटात 156 स्पर्धक...

पुरुष गटात ३१८, तर महिला गटात १५६ स्पर्धक सहभागी होत आहेत. पुरुष गटात सिंगल स्कल्स, डबल स्कल्स, कॉक्सलेस पेअर व कॉक्सलेस फोरमध्ये २००० मी. व ५०० मी.च्या शर्यती होतील. तसेच ओपन डबल स्कल्स, कॉक्सलेस फोर व कॉक्सलेस एट गटात २००० मी. शर्यती होतील. महिला गटात सिंगल स्कल्स, डबल स्कल्स, कॉक्सलेस पेअर व कॉक्सलेस फोरमध्ये २००० मी. व ५०० मी. च्या शर्यती होतील. डबल स्कल्स ५०० मी. व अपंग पुरुष गटात सिंगल स्कल्स २०० व ५०० मी. च्या शर्यतींचा समावेश आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सहआयोजकत्वाने व रोइंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने तसेच आर्मी रोइंग नोड, सी.एम.ई, पुणे यांच्या वतीने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

---

## काळाखडक 'एसआरए' प्रकल्पाला 'ग्रहण'!

### जागामालक विकसकांची खंत : राजकीय स्वार्थासाठी गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाकड-काळाखडक येथील एसआरए प्रकल्पाचे आम्ही जागामालक असून सर्व कायदेशीर बाबी पूर्ण केल्या आहेत. याची माहिती एसआरए कार्यालयात सर्वांसाठी उपलब्ध आहे. झोपडपट्टीधारक सर्वांना पक्के, प्रशस्त घरे देऊन काळाखडकचा कायापालट करण्याचा आम्ही निश्चय केला आहे. शहरातील या पायलट प्रकल्पाचे सर्व प्रेझेंटेशन लवकरच रहिवाशांना देणार आहेत. काही लोक राजकीय व आर्थिक स्वार्थापोटी गैरसमज पसरवत आहेत अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मे. जय इंटरप्रायझेसचे विकसक केतुल सोनिगरा यांनी केले आहे.**




> मे.जय इंटरप्रायझेस हे जमीन मालक असून काळाखडकचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांचा एकमेव प्रस्ताव आमच्याकडे दाखल झाला आहे. त्यांच्या व्यतिरिक्त अन्य एक-दोन विकसक प्रयत्न करत असल्याचे आमच्या कानावर आहे. मात्र, नियमानुसार जागामालकाला प्रथम प्राधान्य दिले जाते. त्यामुळे मे. जय इंटरप्रायझेस यांना प्रथम संधीने त्यांचा प्रस्ताव मान्य केलेला आहे.
>
> **- निलेश गटणे,** सीईओ (आयुक्त) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.

वाकड- काळाखडक झोपडपट्टीतील रहिवाशांना विश्वासात न घेता विकसक एसआरए पुनर्वसन प्रकल्प राबवित असल्याचा आरोप करत रहिवाशांनी वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष अनिल जाधव यांच्या नेतृत्वाखाली काळाखडक चौकात सोमवारी (ता. २९) सकाळी निदर्शन आंदोलन केले. याबाबत केतुल सोनिगरा यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

झोपडपट्टीत एसआरए पुनर्वसन प्रकल्प राबविण्यासाठी रहिवाशांच्या चुकीच्या पध्दतीने सहमती घेण्याचे काम करत आहेत. काही दलाल व गुंडांना हाताशी धरून मनमानी पद्धतीने व दडपशाहीने काहीजण येथे रहिवाशांना अर्ज भरण्यास भाग पाडले जात आहे असा आरोप करत काही रहिवाशांनी घोषणाबाजी केली. त्यामुळे संभ्रम निर्माण झाला होता. पिंपरी-चिंचवड महापालिका आणि एसआरए विभागाने तात्काळ दखल घेऊन या बेकायदेशीर बिल्डरांच्या विरोधात योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा काळाखडक संघर्ष समितीच्या वतीने लवकरच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयावर व महापालिका भावनावर मोर्चा काढण्याचा इशारा अनिल जाधव यांनी दिला. यावेळी काळाखडक परिसरातील विविध पक्ष संघटनांचे कार्यकर्ते, रहिवाशी उपस्थित होते.




# तैवान पुन्हा धुमसणार, कारण..

**आंतरराष्ट्रीय राजकारणातील या वर्षीची महत्त्वाची घटना म्हणून तैवानमध्ये नुकत्याच झालेल्या निवडणुकांचा उल्लेख करावा लागेल. एकविसाव्या शतकात अमेरिका आणि चीन यांच्यात सुरू असलेल्या शीतयुद्धात 'तैवान' हे महत्त्वाचे प्यादे आहे. तैवान आमचा आहे, जिनपिंग यांच्या नेतृत्वाखालचा चीन आज ना उद्या तैवान घशात घालण्याचा जोरदार प्रयत्न करेल, असा अंदाज आहे.**



काय वाट्टेल ते झाले तरी अमेरिका चीनचे हे स्वप्न पूर्ण होऊ देणार नाही. या तापलेल्या पार्श्वभूमीवर तैवानमध्ये मागच्या आठवड्यात झालेल्या निवडणुकांकडे पाहावे लागेल. या निवडणुकांत मतदारांना नवे राष्ट्राध्यक्ष आणि नवे विधिमंडळ निवडून द्यायचे होते. सत्ताधारी डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी, महत्त्वाचा विरोधी पक्ष- कुओमितांग पक्ष आणि २०१९ साली स्थापन झालेली तैवान पीपल्स पार्टी हे तीन प्रमुख पक्ष रिंगणात होते. चीनसारखा भीमकाय देश शेजारी असला म्हणजे तैवानसारख्या चिमुकल्या (राजधानी-: तायपेयी, लोकसंख्या-: सुमारे अडीच कोटी) देशाच्या अंतर्गत राजकारणात 'चीनशी संबंध' हा फार महत्त्वाचा मुद्दा ठरतो. (भारताला याचा अनुभव आहे. पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका वगैरे देशांतसुद्धा 'भारताशी संबंध' हा मुद्दा महत्त्वाचा असतोच). चीन व तैवान यांच्यातील नैसर्गिक सीमा म्हणजे तैवानचा सुमारे १३० किलोमीटर लांबीची सामुद्रधुनी. आता निवडणुका जिंकलेल्या डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पक्षाला 'स्वतंत्र, सार्वभौम तैवान' हवा आहे. चीनचे कट्टर विरोधक समजले जात असलेले आणि आधी उपराष्ट्राध्यक्षपदी असलेले लाई चिंग-ते आता राष्ट्राध्यक्षपदावर विराजमान होतील. गेल्या तीन अध्यक्षीय निवडणुकांत हा पक्ष विजयी होत आला आहे. त्यामुळे सर्वसामान्य तैवानी जनतेला 'स्वतंत्र तैवान' हवा आहे, असा निष्कर्ष काढता येतो, मात्र चीनशी जुळवून घेतले पाहिजे, अशी कुओमिनगतांग या पक्षाची भूमिका आहे, तर तैवान पिपल्स पक्ष मध्यममार्गी आहे. मतदानाची टक्केवारी बघितली तर तैवानी मतदारांनी दिलेल्या कौलाचा अंदाज करता येतो. निवडून आलेल्या लाई चिंग-ते यांना सुमारे ४० टक्के मते, त्यांचे नजिकचे प्रतिस्पर्धी हाऊ यू-इ यांना ३३.५ टक्के तर वेज-जे यांना २६.५ टक्के मते मिळाली आहेत. याचा अर्थ लाई चिंग-ते यांचा विजय 'दणदणीत' नाही. अध्यक्षपदाची निवडणूक तिसऱ्यांदा जिंकलेल्या या पक्षाला विधिमंडळात बहुमत मिळवता आलेले नाही, हेसुद्धा लक्षात घ्यावे लागते. साम्यवादी चीनची १९४९ सालापासून भूमिका आहे की तैवान चीनचा अविभाज्य भाग असून आज ना उद्या तैवानला चीनमध्ये विलीन व्हावे लागेल. चीन जरी ही भूमिका नेहमी मांडत असला तरी याबद्दल एवढी वर्षे साम्यवादी चीन फारसा आक्रमक नव्हता. क्षी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखालचा चीन अतिशय आक्रमक झाला असून चीनने जाहीर केले आहे की तैवानने लवकरात लवकर चीनमध्ये विलीन व्हावे. वेळ पडल्यास आम्हाला यासाठी लष्करी कारवाई करावी लागेल. तैवानबद्दल चीनची ही भूमिका काय आहे, हे समजून घेण्यासाठी अनेक मुद्दे थोडक्यात समजून घ्यावे लागतील. त्यासाठी आधुनिक चीनचा इतिहास नजरेखालून घालणे गरजेचे आहे. तैवान इ.स. १६८३ सालापर्यंत चिनी साम्राज्याचा भाग नव्हता. या वर्षी चीनने तैवानचा पराभव केला व हळूहळू तैवानला चीनचा भाग बनविण्याची प्रक्रिया सुरू झाली. इ.स. १८९५ साली झालेल्या चीन-जपान युद्धात चीनला तैवानचा ताबा जपानला द्यावा लागला. दुसऱ्या महायुद्धात जपानने तैवानचा लष्करी तळ म्हणून वापर केला व स्वतःचे साम्राज्य आग्रेय आशियात विस्तारले. जगातील अनेक देशांप्रमाणे चीनमध्येसुद्धा विसावे शतक सुरू होईपर्यंत साम्राज्यशाही होती. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जगभर बदलांचे वारे वाहू लागले. ते चीनमध्ये डॉ. सुन यात सान (१८६६ ते १९२५) यांच्या रूपाने दाखल झाले. डॉ. सुन यात सान यांच्या प्रयत्नांनी इ.स. १९११ मध्ये चीनमधील साम्राज्यशाही संपली व 'प्रजासत्ताक चीन'चा उदय झाला. त्यानंतर १० वर्षांनी म्हणजे इ.स. १९२१ मध्ये 'चीन कम्युनिस्ट पार्टी'ची स्थापना झाली. साम्राज्यशाहीचे अवशेष पूर्णपणे संपवण्यासाठी डॉ. सान यांनी सोव्हिएत युनियनशी १९२३मध्ये करार केला. या मदतीच्या मोबदल्यात डॉ. सान यांनी त्यांच्या पक्षाच्या म्हणजे 'कोमींगटान'च्या जाहिरनाम्यात काही मार्क्सवादी कार्यक्रमांचा अंतर्भाव केला.

## संपादकीय »

### नीतीश कुमार!

***बिहारमध्ये नीतीश कुमार पुन्हा एकदा भाजपच्या कळपात येण्याचा फार काही राजकीय लाभ नाही, हे भाजपच्या धुरिणांस ठाऊक नसेल, असे नाही.***

बिहारमध्ये नीतीश कुमार पुन्हा एकदा भाजपच्या कळपात येण्याचा फार काही राजकीय लाभ नाही, हे भाजपच्या धुरिणांस ठाऊक नसेल, असे नाही. तरीही नीतीश आणि त्यांच्या जनता दलास आपल्याकडे वळविण्याचा घाट भाजपने घातला. त्यामागील एकमेव कारण म्हणजे विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीस अपशकुन करणे. त्यात भाजपचे यश निर्विवाद. या यशासाठी भाजपचे बिहार प्रभारी महाराष्ट्राचे विनोद तावडे हे खचितच अभिनंदनास पात्र ठरतात. एकेकाळच्या काँग्रेसप्रमाणे भाजपत नेतृत्वाकडून अवहेलना सहन करण्याची क्षमता असलेल्याचे नंतर भले होते. विनोद तावडे हे त्याचे एक महत्त्वाचे उदाहरण. गेल्या विधानसभा निवडणुकीत आमदारकीसाठी उमेदवारीही नाकारली गेलेल्या तावडे यांचे दिल्लीत पुनर्वसन झाले आणि बिहारसारख्या राज्याची जबाबदारी त्यांच्याकडे दिली गेली. ती त्यांनी किती उत्तम पार पाडली.

**एक मराठा लाख मराठा' या घोषणेभोवती जमणारी गर्दी गेले काही वर्षे वाढत गेली. गर्दी जमण्याचे इंजिन आणि त्याचे सुटे भाग कसे आणि कोठे तयार झाले, त्याची पार्श्वभूमी मराठवाड्याच्या भूमीतच का निर्माण झाली या प्रश्नांची उत्तरे शोधताना अनेक घटनांची शृंखला समोर ठेवावी लागेल.**

# मागासपणा वाढतो की जातीयवाद?



२००४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी जेम्स लेन प्रकरण तापले होते. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेतील काहीजणांनी छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करणारी माहिती जेम्स लेन यास पुरवली. तेव्हा ही संस्थाच चुकीचा इतिहास पसरवत आहे, अशी तीव्र भावना मराठा समाजात निर्माण झाली. त्यातून कळंब तालुक्यातील अनंत चोंदे या तरुणाने ७२ जणांचा एक चमू तयार केला आणि पुण्यातील भांडारकर संस्थेवर हल्ला केला. पुढे अनंत चोंदे संभाजी ब्रिगेडचे प्रमुख असताना इतिहासाच्या पुस्तकातील मजकुरावर आक्षेप घेण्यात आले. दादोजी कोंडदेव यांचा पुण्यातील पुतळा तसेच राम गणेश गडकरी पुतळा हटविण्यापर्यंतची अनेक आंदोलने झाली. तेव्हा आंदोलनाचे दोन केंद्र होते. मराठवाड्यातील तरुण आणि पुणे शहरातील प्रतिके. तत्पूर्वी मूळचे लातूर येथील अण्णासाहेब जावळे यांच्या कार्यकर्त्यांनी लालकृष्ण अडवाणी यांच्या गाडीसमोर स्वतः झोकून देत रस्ता रोको केला. त्यानंतर वादग्रस्त जेन्स लेन पुस्तकाचा संदर्भ देशभर चर्चेत आला. पुढे त्या पुस्तकावर बंदी आली. या काळात देण्यात आलेला संदेश होता की, उच्चवर्णीय आणि विशेषतः ब्राम्हण इतिहासाची मोडतोड करतात, छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या लाखोंच्या प्रेरणास्रोताचा अवमान करताना ते मागेपुढे पाहत नाहीत, ही भावना मराठा समाजात दाटून राहिलेली. याच काळात संभाजी ब्रिगेड आणि मराठा सेवा संघाने शिवधर्माची चर्चा सुरू केली. या घटना घडामोडीच्या काळात गृहमंत्रीपदी आर. आर. पाटील होते. यांच्या समोर प्राच्य विद्या संस्थेवर हल्ला करणारे तरुणांवरील गुन्हे मागे घ्यावेत अशा घोषणा आवर्जून दिल्या जात होत्या. अर्थात हे गुन्हे काही माघारी घेतले गेले नाहीत. त्यातील अनेक तरुणांना न्यायालयीन लढे लढण्यासाठी खूप कष्ट करावे लागले. त्यांच्यासमोर शेतीशिवाय पर्याय राहिले नाहीत. या कालखंडात जातीयवाद वाढविण्यात शरद पवार यांचा मोठा हात होता, असा आरोप राज ठाकरे यांनी अगदी अलिकडेच केला होता. एका बाजूला मराठा समाजातील अंतर्प्रवाह आणि विचार बदलले जात असताना ब्राम्हण समाजातील काहींनी परभणी, बीड येथे अधिवेशने घेतली. या काळात अचानकच परशुराम जयंती मोठी केली जाऊ लागली. हातात परशु घेतलेल्या ऋषींचे भ्रमणध्वनीवर स्टेटस ठेवले जाऊ लागले. विरोधी विचार करणाऱ्या संपादक आणि वर्तमानपत्रातील व्यक्तीशी झोंबाझोंबी करण्यापर्यंत ब्राम्हण समाजातील तरुण आक्रमक झाले. विरोधात विचार व्यक्त करणारी व्यक्ती म्हणजे शत्रू अशी भावना समाजात रुजवली जात होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला 'महाईन्यूज'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# हरित ऊर्जा प्रकल्पासाठी सामंजस्य करार!

## रोजगार उपलब्ध होण्यासाठी ॲमेझॉन, बिग बास्केट, फ्लिपकार्ट यांच्याशी करार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हरित ऊर्जा आणि हरित स्टील प्रकल्प या दोन्ही क्षेत्रात आज एकाच दिवशी ३,१६,३०० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. यातून ८३,९०० रोजगार उपलब्ध होणार आहेत. याशिवाय कृषी मूल्य साखळी अंतर्गत शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी ॲमेझॉन, बिग बास्केट, फ्लिपकार्ट यांच्याशी करार करण्यात आले.**




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हे सामंजस्य करार सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आले आहेत. यातील ऊर्जा क्षेत्रात एकूण ७ कंपन्यांशी हरित ऊर्जा निर्मितीसाठी २,७६,३०० कोटी रुपयांचे करार केले आहेत. यातून ६३,९०० इतकी रोजगारनिर्मिती होणार आहे. यात एनटीपीसी ग्रीन एनर्जी लिमिटेडबरोबर एकूण गुंतवणुकीचा ८०,००० कोटींचा करार करण्यात आला असून, यातून १२ हजार रोजगार मिळणार आहे. जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेडबरोबर एकूण १५,००० कोटींच्या गुंतवणुकीचा करार करण्यात आला असून, ११ हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत. तसेच अवादा ग्रीन हायड्रोजन प्रा. लि. आणि बाफना सोलार अँड इन्फ्रा. प्रा. लि. (एकूण ५०,००० कोटी रुपये गुंतवणूक/८९०० रोजगार), रिन्यू ईफ्युएल प्रा. लि. (एकूण गुंतवणूक ६६,४०० कोटी/२७ हजार रोजगार), वेल्सपन गोदावरी जीएच २ प्रा. लि. (एकूण गुंतवणूक २९,९०० कोटी/१२,२०० रोजगार), आयनॉक्स एअर प्रॉडक्टस (एकूण गुंतवणूक २५,००० कोटी रुपये/३०० रोजगार) आणि एल अँड टी ग्रीन एनर्जी टेक लि. (१० हजार कोटी रुपये गुंतवणूक/१००० रोजगार) यांचा समावेश आहे.दुसरा सामंजस्य करार महाराष्ट्रात हरित पोलाद प्रकल्पासाठी करण्यात आला. आर्सेलर मित्तल निप्पॉन इंडिया आणि महाराष्ट्र सरकारच्या उद्योग विभागाशी झालेल्या या करारात एकूण ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असून, २० हजार रोजगार निर्मिती होणार आहे. हा करारसुद्धा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत करण्यात आला. उद्योगमंत्री उदय सामंत आणि अन्य अधिकारी यावेळी उपस्थित होते.राज्य सरकारने कृषी मूल्य साखळीचा दुसरा टप्पा आता प्रारंभ केला आहे. सबसिडीतून, नुकसानभरपाईतून शेतीचे क्षेत्र बाहेर काढण्यासाठी विविध उपाययोजना २०१४-१९ या काळात करण्यात आल्या. शेती क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यातून नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, स्मार्ट यांसारख्या योजनांची आखणी झाली. वातावरणपूरक शेती हाही प्रयत्न झाला.

शेतकऱ्यांना थेट बाजाराशी जोडण्याचा निर्णय झाला. त्यासाठीच कृषी मूल्य साखळीच्या उपाययोजना प्रारंभ करण्यात आल्या, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. या दोन्ही करारांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी विभागाने आयोजित केलेल्या कृषिमूल्य साखळी भागीदारी बैठकीत उपस्थित राहून मनोगत व्यक्त केले. कृषिमंत्री धनंजय मुंडे आणि अन्य अधिकारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज सर्वात महत्त्वाचे सामंजस्य करार झाले, ज्याची आमच्या शेतकरी बांधवांना गरज आहे, ते कृषी विभागाचे आहेत. यात ॲमेझॉन, बिग बास्केट, फ्लिपकार्ट यांच्यासमवेत करार झाले. यामुळे शेतकरी आपला कृषीमाल आता थेट या कंपन्यांना विकू शकणार आहेत. आजच्या संपूर्ण दिवसातील हा कार्यक्रम माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हे सामंजस्य करार सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आले आहेत. यातील ऊर्जा क्षेत्रात एकूण ७ कंपन्यांशी हरित ऊर्जा निर्मितीसाठी २,७६,३०० कोटी रुपयांचे करार केले आहेत.

### 7 कंपन्यांशी सामंजस्य करार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हे सामंजस्य करार सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आले आहेत. यातील ऊर्जा क्षेत्रात एकूण ७ कंपन्यांशी हरित ऊर्जा निर्मितीसाठी २,७६,३०० कोटी रुपयांचे करार केले आहेत. यातून ६३,९०० इतकी रोजगारनिर्मिती होणार आहे. यात एनटीपीसी ग्रीन एनर्जी लिमिटेडबरोबर एकूण गुंतवणुकीचा ८०,००० कोटींचा करार करण्यात आला असून, यातून १२ हजार रोजगार मिळणार आहे. जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेडबरोबर एकूण १५,००० कोटींच्या गुंतवणुकीचा करार करण्यात आला असून, ११ हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत. तसेच अवादा ग्रीन हायड्रोजन प्रा. लि. आणि बाफना सोलार अँड इन्फ्रा. प्रा. लि. (एकूण ५०,००० कोटी रुपये गुंतवणूक/८९०० रोजगार), रिन्यू ईफ्युएल प्रा. लि. (एकूण गुंतवणूक ६६,४०० कोटी/२७ हजार रोजगार), वेल्सपन गोदावरी जीएच २ प्रा. लि. (एकूण गुंतवणूक २९,९०० कोटी/१२,२०० रोजगार), आयनॉक्स एअर प्रॉडक्टस (एकूण गुंतवणूक २५,००० कोटी रुपये/३०० रोजगार) आणि एल अँड टी ग्रीन एनर्जी टेक लि. यांचा समावेश आहे. दुसरा सामंजस्य करार महाराष्ट्रात हरित पोलाद प्रकल्पासाठी करण्यात आला.

# राजकीय जीवनात माझ्यावर दोन संकटं आली!

## उपमुख्यमंत्री अजित पवारांसमोर हसन मुश्रीफांना अश्रू अनावर

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**तुमच्या ताकदीवर अनेक संकटं पेलून उभा राहिलो आहे, असे म्हणत मतदारांचे आभार मानत असताना वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांना अश्रू अनावर झाले. कोल्हापूरच्या कागलमधील सागांव येथे सोमवारी (२९ जानेवारी) सायंकाळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने शेतकरी मेळाव्याचं आयोजन केलं होतं. स्थानिक आमदार, वैद्यकीय शिक्षणमंत्री आणि कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ भावूक झाल्याचं पाहायला मिळालं.**

माझ्या जीवनात दोन वेळा राजकीय संकटं आली, परंतु, मतदार पाठीशी असल्यामुळे मी दोन्ही संकटं पेलून नेली, असं मुश्रीफ यावेळी म्हणाले.हसन मुश्रीफ जनतेला उद्देशून म्हणाले, तुमच्या ताकदीवर आजपर्यंत मी अनेक संकट लीलया पेलून नेली आहेत. आपण अनेक संकटांमधून बाहेर पडलो आहोत. यासाठी मी मतदारसंघातल्या जनतेचे मनःपूर्वक आभार मानतो. आजपर्यंत जी संकटं आली, त्यातून आपण बाहेर पडलो. माझ्या कारकिर्दीत दोन वेळा माझ्यावर राजकीय संकटं आली. या काळात मला तुमच्याकडून प्रचंड प्रमाणात साथ मिळाली. जनता माझ्या पाठिशी होती. तुमचा आशीर्वाद होता. त्यामुळेच मी मतदारसंघातल्या सहा निवडणुका जिंकलो. आता मी सातवी निवडणूक लढणार आहे. एखाद्या सामान्य कार्यकर्त्यावर कसं प्रेम करावं ते माझ्या तालुक्यातल्या जनतेने दाखवून दिलं आहे. त्यामुळे मी या जनतेचा आभारी आहे. हसन मुश्रीफ म्हणाले, मी आधी विक्रमसिंह घाटगे यांचा कार्यकर्ता होतो. छत्रपती शाहू कारखान्याचा मी संचालक, संस्थापक आणि उपाध्यक्ष होतो. परंतु, मला एकदा उमेदवारी दिली नाही. त्यमुळे मी त्यांचं नेतृत्व सोडलं आणि दिवंगत खासदार सदाशिवराव मंडलिक यांचं नेतृत्व स्वीकारलं. परंतु, नंतर माझ्यात आणि खासदार मंडलिक यांच्यात मतभेद झाले. त्यानंतर मी नवी वाट धरली. या सगळ्या काळात मला जनतेची प्रचंड साथ मिळाली. जनतेने मला साथ दिल्यामुळेच सलग सहा वेळा आमदार म्हणून निवडणूक आलो. गेल्या २५ ते ३० वर्षांपासून मी आमदार आहे. बराच काळ सत्तेतही राहिलो. माझ्या मतदारसंघात विकास केला. मंत्री झाल्यावर राज्यभर काम केलं, ही गोष्ट मी अभिमानाने सांगतो.



### दोन वेळा माझ्यावर राजकीय संकटं

इया जीवनात दोन वेळा राजकीय संकटं आली, परंतु, मतदार पाठीशी असल्यामुळे मी दोन्ही संकटं पेलून नेली, असं मुश्रीफ यावेळी म्हणाले. हसन मुश्रीफ जनतेला उद्देशून म्हणाले, तुमच्या ताकदीवर आजपर्यंत मी अनेक संकट लीलया पेलून नेली आहेत. आपण अनेक संकटांमधून बाहेर पडलो आहोत. यासाठी मी मतदारसंघातल्या जनतेचे मनःपूर्वक आभार मानतो. आजपर्यंत जी संकटं आली, त्यातून आपण बाहेर पडलो. माझ्या कारकिर्दीत दोन वेळा माझ्यावर राजकीय संकटं आली.

# भाजपचे नवे राजकारण!

## बिहारमध्ये नितीश कुमारांना पर्याय सम्राट चौधरी?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारमध्ये नितीशकुमार यांनी महाआघाडीला सोडचिठ्ठी देत पुन्हा एकदा भाजपच्या साथीने नवे सरकार स्थापन केले. या सरकारमध्ये भाजपने सम्राट चौधरी आणि विजय सिंघा यांना उपमुख्यमंत्री केले आहे. चौधरी हे नितीश यांच्याप्रमाणे ओबीसी नेते आहेत. मात्र, ते नितीश (72) यांच्या तुलने तरुण आहेत, जे भाजपसाठी फायदेशीर ठरतील असे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे 55 वर्षीय चौधरींच्या माध्यमातून भाजप 2025 च्या बिहार निवडणुकीसाठी नेमकी कशी तयारी करत आहे याची चर्चा रंगली आहे.**

16 नोव्हेंबर 1968 रोजी जन्मलेले चौधरी सध्या बिहार विधान परिषदेचे सदस्य आहेत. चौधरी हे कुशवाह समाजातील बड्या नेत्यांपैकी एक शकुनी चौधरी यांचे पुत्र आहेत. त्यांनी आपली राजकीय कारकीर्द लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दल (आरजेडी) पासून सुरू केली. 1999 मध्ये ते राबडीदेवी सरकारमध्ये कृषी मंत्री होते. त्यांनी 2000 आणि 2010 मध्ये परबट्टा मतदारसंघाचे आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले. 2014 मध्ये ते जीतन राम मांझी यांच्या सरकारमध्ये आणि 2020 मध्ये नितीश सरकारमध्ये मंत्री होते.चौधरी यांनी 2017 मध्ये आरजेडीला रामराम ठोकला आणि भाजपमध्ये प्रवेश केला. 2018 मध्ये त्यांना भाजपने बिहारचे प्रदेश उपाध्यक्ष बनवले होते आणि आता त्यांच्या राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी वर्णी लागली आहे. त्यांच्या उपमुख्यमंत्रिपदावरून दोन गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत. त्यांच्या रुपाने बिहारमधील भाजपच्या नव नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाला आहे. तर दुसरीकडे नितीश यांच्यासोबत सामंजस्याने राज्य करणाऱ्या सुशील मोदींचा काळ संपला असून आता भाजपला नितीश यांच्याशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवायचे नाहीत.2025 च्या विधानसभा निवडणुकीकडे भाजपचे बारीक लक्ष आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार (कुर्मी) आणि उपमुख्यमंत्री चौधरी (कुशवाह) हे ओबीसी नेत आहेत. अशातच भाजपने चौधरींना महत्त्व देऊन राज्यातील लव (कुर्मी) आणि कुश (कुशवाह) ही व्होटबँक आपल्याकडे आकर्षित करण्याचा जोरदार प्रयत्न केला आहे. राज्यात कुशवाहाची लोकसंख्या 4.27 टक्के आणि कुर्मी 2.87 टक्के आहे.राजकीय मजबुरीमुळे नितीश यांनी अनेकवेळा भाजपसोबत युती



केली. मात्र, गेल्या काही वर्षांत त्यांची व्होट बँक कमकुवत झाली आहे आणि आता भाजप मोठ्या भावाच्या भूमिकेत आहे, हेही त्यांना माहीत आहे. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत भाजप-जेडीयूने प्रत्येकी 17 जागा लढवल्या, परंतु भाजपने जास्त जागा जिंकल्या. 2020 च्या विधानसभा निवडणुकीत जेडीयूला फक्त 43 जागा मिळाल्या, तर भाजपने 78 जागा जिंकल्या. मागासवर्गीय, ओबीसी आणि दलित व्होट बँक्सच्या माध्यमातून नितीश आतापर्यंत सत्तेत आहेत. ओबीसींना वाढीव आरक्षण देण्याचा निर्णय घेऊन त्यांनी मोठी राजकीय खेळी खेळली. पण भाजपमधून चौधरी यांना मिळालेल्या बढतीमुळे नितीश यांच्या जातीय राजकारणाला चोख प्रत्युत्तर म्हणून पाहिले जात आहे. बिहारच्या जात सर्वेक्षणानुसार, राज्यात 63 टक्के ओबीसी (27 टक्के मागासवर्गीय + 36 टक्के अत्यंत मागासवर्गीय) आहेत. चौधरी यांच्या माध्यमातून भाजपची नजर या मतदारांवर आहे. सध्या भाजपचेच वर्चस्व आहे आणि नितीश 'बॅकसीट'वर आहेत. दरम्यान लोकसभा निवडणुकीनंतर नितीश मुख्यमंत्री पदावरून पायउतार होतील असे वातावरण तयार केले जाऊ शकते. यात भाजपला यश आले तर 2025 च्या विधानसभा निवडणुकीसाठी चौधरी यांना मुख्यमंत्री करण्यासाठी आपसूकच मैदान तयार होईल.ऐतिहासिकदृष्ट्या 3 जातींनी बिहारमध्ये उच्च जातीविरोधी चळवळींचे नेतृत्व केले आहे. यात कुशवाह, कुर्मी आणि यादव या जातींचा समावेश आहे. चौधरी कुशवाहतून, नितीश कुर्मीतून आणि लालू प्रसाद यादव यादव समाजातून येतात. यादव आणि कुर्मींनी सत्तेची चव चाखली आहे, तर कुशवाह नेहमीच त्यापासून दूर राहिले आहेत. त्यामुळे चौधरींच्या माध्यमातून सत्तेचा हा दुष्काळ संपवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे.16 नोव्हेंबर 1968 रोजी जन्मलेले चौधरी सध्या बिहार विधान परिषदेचे सदस्य आहेत. चौधरी हे कुशवाह समाजातील बड्या नेत्यांपैकी एक शकुनी चौधरी यांचे पुत्र आहेत. त्यांनी आपली राजकीय कारकीर्द लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दल (आरजेडी) पासून सुरू केली. 1999 मध्ये ते राबडीदेवी सरकारमध्ये कृषी मंत्री होते. त्यांनी 2000 आणि 2010 मध्ये परबट्टा मतदारसंघाचे आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले. 2014 मध्ये ते जीतन राम मांझी यांच्या सरकारमध्ये आणि 2020 मध्ये नितीश सरकारमध्ये मंत्री होते.चौधरी यांनी 2017 मध्ये आरजेडीला रामराम ठोकला आणि भाजपमध्ये प्रवेश केला. 2018 मध्ये त्यांना भाजपने बिहारचे प्रदेश उपाध्यक्ष बनवले होते आणि आता त्यांच्या राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी वर्णी लागली आहे. त्यांच्या उपमुख्यमंत्रिपदावरून दोन गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत.

### बिहारमध्ये मागास जातींमध्ये स्पर्धा?

त्यांच्या रुपाने बिहारमधील भाजपच्या नव नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाला आहे. तर दुसरीकडे नितीश यांच्यासोबत सामंजस्याने राज्य करणाऱ्या सुशील मोदींचा काळ संपला असून आता भाजपला नितीश यांच्याशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवायचे नाहीत.2025 च्या विधानसभा निवडणुकीकडे भाजपचे बारीक लक्ष आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार (कुर्मी) आणि उपमुख्यमंत्री चौधरी (कुशवाह) हे ओबीसी नेत आहेत. अशातच भाजपने चौधरींना महत्त्व देऊन राज्यातील लव (कुर्मी) आणि कुश (कुशवाह) ही व्होटबँक आपल्याकडे आकर्षित करण्याचा जोरदार प्रयत्न केला आहे. राज्यात कुशवाहाची लोकसंख्या 4.27 टक्के आणि कुर्मी 2.87 टक्के आहे.राजकीय मजबुरीमुळे नितीश यांनी अनेकवेळा भाजपसोबत युती केली. मात्र, गेल्या काही वर्षांत त्यांची व्होट बँक कमकुवत झाली आहे आणि आता भाजप मोठ्या भावाच्या भूमिकेत आहे, हेही त्यांना माहीत आहे. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत भाजप-जेडीयूने प्रत्येकी 17 जागा लढवल्या, परंतु भाजपने जास्त जागा जिंकल्या. 2020 च्या विधानसभा निवडणुकीत जेडीयूला फक्त 43 जागा मिळाल्या, तर भाजपने 78 जागा जिंकल्या.मागासवर्गीय, ओबीसी आणि दलित व्होट बँक्सच्या माध्यमातून नितीश आतापर्यंत सत्तेत आहेत.

# मालदीवचे अध्यक्ष मुइज्जूंचं सरकार कोसळणार?

## मालदीवमधील विरोधक महाभियोग दाखल करण्याच्या तयारीत

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइज्जू हे सध्या अडचणीत आले आहेत. मालदीवमधील विरोधी पक्ष मालदीव डेमोक्रेटिक पार्टीने मुइज्जू सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव मांडण्याची तयारी केली आहे. एमडीपीने मुइज्जू सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याची तयारी केली आहे. तसेच मुइज्जू यांच्याविरोधात महाभियोग दाखल करण्याच्या हष्टीने पावलं उचलली आहेत.**

यासाठी खासदारांचं पुरेसं संख्याबळ असावं म्हणून विरोधी पक्षांच्या बैठकांची सत्रं सुरू झाली आहेत. अविश्वास प्रस्तावावर खासदारांनी सह्या करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे मालदीवच्या संसदेत लवकरच चीन समर्थक राष्ट्राध्यक्षांविरोधात महाभियोग दाखल केला जाण्याची शक्यता आहे.अलीकडेच मालदीवच्या संसदेत राडे झाल्याची प्रकरणं समोर आली आहेत. मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांच्या मंत्रिमंडळात चार मंत्र्यांची नेमणूक करण्यासाठी रविवारी (२८ जानेवारी) संसदेत



मतदान होणार होतं. परंतु, विरोधी पक्षाने त्यावर आक्षेप घेतल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या खासदारांमध्ये झटापट झाल्याचं पाहायला मिळालं. याआधीही एकदा खासदार हमरीतुमरीवर आले होते.मालदीवमध्ये पीपल्स नॅशनल काँग्रेस (PNC) आणि प्रोग्रेसिव्ह पार्टी ऑफ मालदीव (PPM) हे दोन पक्ष सत्तेत आहेत. तर माजी अध्यक्ष इब्राहिम मोहम्मद सोलिह यांचा मालदीव डेमोक्रॅटिक पार्टी (MDP) हा पक्ष विरोधात आहे. विरोधात असलेल्या पक्षाचे मालदीवच्या संसदेत सत्ताधाऱ्यांपेक्षा जास्त खासदार आहेत. त्यामुळे विरोधी पक्षाने त्यांच्या बहुमताच्या जोरावर विद्यमान अध्यक्ष मुइज्जूंची मंत्र्यांच्या नेमणुकीदरम्यान अडवणूक करण्याचा प्रयत्न केला.

### मुइज्जू यांची पदावरून गच्छंती

ज्याचे पर्यवसन खासदारांच्या हाणामारीत झाले. या हाणामारीत दोन खासदार जखमी झाले.मालदीवच्या घटनेनुसार महाभियोगाचा प्रस्ताव पहिल्या सभागृहाने दोन-तृतीयांश बहुमताने पारित केला तर तो प्रस्ताव दुसऱ्या सभागृहाकडे पाठवला जातो. दुसऱ्या सभागृहातील सदस्य या आरोपांची चौकशी करतात. यावेळी अध्यक्षांनाही आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार असतो. त्यानंतरही दुसऱ्या सभागृहातील दोन-तृतियांश सदस्यांनी हा प्रस्ताव पारित केला, तर तो प्रस्ताव पारित करण्याच्या तारखेपासून राष्ट्रपतींना पदावरून बाजूला केले जाते. एकंदरीतच महाभियोग प्रक्रिया ही अर्धन्यायिक प्रक्रिया आहे. भारतात आजपर्यंत कोणत्याही राष्ट्रपतींवर महाभियोग चालवण्यात आलेला नाही.

# ऐश्वर्याच्या समर्थनार्थ काय म्हणाले रजनीकांत?

माझे वडिल संघी असते तर, त्यांनी लाल सलाम सारखा सिनेमा केला नसता, असे वक्तव्य सुपरस्टार रजीनीकांत यांची मुलगी ऐश्वर्या हिने काही दिवसांपूर्वी केले होते. दरम्यान, आता रजनीकांत यांनी मुलीच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. रजनीकांत मुलीच्या समर्थनार्थ मैदानात उतरले आहेत. माझ्या मुलीने 'संघी' हा शब्द वाईट अर्थाने वापरला नाही, असे स्पष्टीकरण रजनीकांत यांनी दिले आहे. दाक्षिणात्य अभिनेता आणि सुपरस्टार रजनीकांत सध्या लाल सलाम या सिनेमामुळे चर्चेत आहेत. नुकताच लाल सलाम या सिनेमाचा ऑडिओ लॉंच इव्हेंट पार पडला. यावेळी रजनीकांतची मुलगी आणि सिनेमाची दिग्दर्शक ऐश्वर्या देखील उपस्थित होती. यावेळी ऐश्वर्यने मनोगत व्यक्त केले होते. "माझे वडिल संघी नाहीत", असे ऐश्वर्या म्हणाली होती. दरम्यान, यानंतर ऐश्वर्या आणि रजनीकांत यांना सोशल मीडियावर ट्रोलिंगचा सामना करावा लागला. त्यानंतर रजनीकांत यांनी संघी या शब्दाबाबत मौन सोडले आहे. ऐश्वर्याला संघी हा शब्द वाईट अर्थाने वापरायचा नव्हता, असे रजनीकांत म्हणाले आहेत. लाल सलाम या सिनेमाचा ऑडिओ लॉंच इव्हेंट काही दिवसांपूर्वी पार पडला. यावेळी ऐश्वर्याने वडील रजनीकांत यांच्यावर होणाऱ्या व्यक्तीगत टीकेला प्रत्युत्तर दिले होते. ऐश्वर्या म्हणाली होती की, सोशल मीडियावर माझ्या वडिलांना संघी म्हटले जात आहे. माझे वडिल संघी नाहीत, ते संघी असते तर त्यांनी लाल सलाम सारखा सिनेमा केला नसता. नेटकऱ्यांच्या ट्रोलिंगबाबत ऐश्वर्याने नाराजी व्यक्त केली.

# सैफ अलीच्या मुलासाठी करणने केली चित्रपटाची घोषणा

करण जोहरने २८ जानेवारीला दुपारी त्याच्या सोशल मीडियावर एक पोस्ट केली. त्यावर कमेंट सेक्शनमध्ये लोकांनी उत्तर देत त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. करणने बहुतेक प्रथमच अशा रीतीने एखाद्या चित्रपटाची घोषणा केली असल्याचं दिसत आहे. करणच्या या पोस्टची सध्या प्रचंड चर्चा होत आहे. या पोस्टमध्ये करणने चित्रपटासंबंधी तीन प्रश्न विचारले आहेत. या तीन प्रश्नांमधून करणने चांगलाच सस्पेन्स निर्माण केला आहे. नेमकं करण पोस्टमध्ये लिहितो, “ही कोणत्याही चित्रपटाची घोषणा नाही, किंवा असूही शकते जर तुम्ही मदत केलीत तर. गेल्यावर्षापासून आम्ही एका चित्रपटावर काम करत आहोत आणि याबद्दल चांगलीच गुप्तता पाळण्यात आली होती. चित्रपटाच्या दिग्दर्शकाचीच तशी मागणी होती. तर या काही हिंट आहेत ज्यावरून आम्ही नेमक्या कोणत्या चित्रपटाबद्दल बोलत आहोत ते तुम्हाला ओळखायचं आहे. पहिली हिंट म्हणजे यात एक अत्यंत लोकप्रिय अशी अभिनेत्री आहे, दुसरी हिंट म्हणजे यात दक्षिणेतील एक मोठा सुपरस्टार आहे ज्याने नुकताच एक जबरदस्त पॅन-इंडिया सुपरहीट चित्रपट दिला आहे. तिसरी हिंट अशी की यात एक लेगसी डेब्यू अभिनेता आहे जो या इंडस्ट्रीमध्ये स्वतःचं स्थान निर्माण करण्यासाठी फार उत्सुक आहे व प्रचंड मेहनत घेत आहे.”पुढे करण लिहितो, “हा चित्रपट जवळपास तयारच आहे लवकरच आम्ही तो प्रदर्शित करणार आहोत? तुमच्या मते हा

# प्राजक्ता माळीचं सेलिब्रेशन



अभिनेत्री प्राजक्ता माळी (PRAJAKTTA MALI) ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. प्राजक्ताच्या सोशल मीडियावरील पोस्ट नेटकऱ्यांचे लक्ष वेधतात. नुकताच प्राजक्तानं एक खास व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही तिच्या कुटुंबासोबत 31 डिसेंबरचं सेलिब्रेशन करताना दिसत आहे. प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती कुटुंबासोबत ॲनिमल या चित्रपटामधील 'जमाल कुदु' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. प्राजक्तानं डोक्यावर एक ग्लास ठेवलेला दिसत आहे. तसेच प्राजक्तानं तिच्या कुटुंबासोबत 'मै हूं डॉन' या गाण्यावर देखील डान्स केला. व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही चुलीजवळ बसून भाकऱ्या थापताना देखील दिसत आहे. या व्हिडीओला प्रजक्तानं कॅप्शन दिलं, "ABOUT 31ST DECEMBER, आमचे बॉबी देओलS आणि डॉनS... यात माझा 2023 चा शेवटचा सेल्फी आणि 2024 चा पहिला सेल्फी देखील आहे." प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव देखील केला आहे. एका नेटकऱ्यानं प्राजक्ताच्या व्हिडीओला कमेंट केली, "प्राजक्ता..खूपच भारी आहेस तू.कुटुंबाबरोबर जे तुझे क्षण असतात त्यांत तू खूप खुश, सुंदर दिसतेस. प्राजक्ता सर्व गुण संपन्न मुलगी." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असेच क्षण जपायचे असतात प्राजक्ता आणि तू ते खुप भारी जपतेस THAT'S WE LOVE YOU . तू भाकरी करतानाचा पूर्ण व्हिडीओ टाक ना . मी मागे म्हटले होते ना की तु All ROUNDER आहेस तला भाकरी करतांना पाहून ते सिद्ध झाले.

# मी तुला पुढच्या लग्नाला बोलावेन

बॉलीवूड अभिनेता व सलमान खानचा भाऊ अरबाज खानने २४ डिसेंबर २०२३ रोजी दुसरं लग्न केलं. त्याने मेकअप आर्टिस्ट शुरा खानशी बहीण अर्पिता खानच्या घरी निकाह केला. त्याच्या लग्नाला सलमान खान, सोहेल खान, वडील सलीम खान, आई सलमा व हेलन यांच्यासह त्याचा मुलगा अरहानदेखील उपस्थित होता. अरबाजच्या दुसऱ्या लग्नाबद्दल सलमान खानने पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. बिग बॉस १७ च्या ग्रँड फिनालेमध्ये भारती सिंगने सलमान खानला अरबाज खानच्या लग्नाबाबत काही प्रश्न विचारले. बिग बॉस १७ च्या फिनालेमध्ये अरबाज खान व सोहेल खानही आले होते. यावेळी या तिघा भावांची चेष्टा-मस्करी पाहायला मिळाली. भारती सिंगने स्टेजवर उपस्थित अरबाजला गंमतीत विचारलं की, “तुम्ही आम्हाला तुमच्या लग्नाला बोलावलं नाही.” अरबाज म्हणाला, “त्यात काय, मी तुला पुढच्या लग्नाला बोलावेन. पण दुसऱ्याच्या लग्नात.”अरबाज असं म्हटल्यावर भारती सिंगने सलमान खानला प्रश्न विचारला. “मोठा भाऊ म्हणून तुम्ही अरबाजला लग्नाबाबत कोणताही सल्ला दिला नाही का?” यावर सलमान खान हसतो आणि म्हणतो “अरबाज कोणाचंही ऐकत नाही, जर तो ऐकता असता तर...”. यानंतर तो बोलणं थांबवतो. मग भारती स्टेजवर उपस्थित असलेल्या सोहेलच्या स्टाइलची खिल्ली उडवते. चप्पल आणि शॉर्ट्स घालण्याच्या त्याच्या कॅज्युअल फॅशन सेन्सची ती चेष्टा करते, ते ऐकून सलमान खानही हसतो. दरम्यान, अरबाज खानने त्याच्यापेक्षा २५ वर्षांनी लहान शुरा खानची दुसरं लग्न केलं. अरबाजचं पहिलं लग्न मलायका अरोराशी झालं होतं. १९ वर्षांच्या संसारानंतर त्यांनी सहा वर्षांपूर्वी घटस्फोट घेतला आणि त्यांना अरहान नावाचा मुलगा आहे. घटस्फोटानंतर मलायका अरोरा अर्जुन कपूरबरोबर रिलेशनशिपमध्ये आहे. तर अरबाजने शुराशी लग्न केलंय.बॉलीवूड अभिनेता व सलमान खानचा भाऊ अरबाज खानने २४ डिसेंबर २०२३ रोजी दुसरं लग्न केलं. त्याने मेकअप आर्टिस्ट शुरा खानशी बहीण अर्पिता खानच्या घरी निकाह केला. त्याच्या लग्नाला सलमान खान, सोहेल खान, वडील सलीम खान, आई सलमा व हेलन यांच्यासह त्याचा मुलगा अरहानदेखील उपस्थित होता. अरबाजच्या दुसऱ्या लग्नाबद्दल सलमान खानने पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे.

# मयुरी देशमुखचा 'लग्नकल्लोळ'



मयुरी देशमुख, सिद्धार्थ जाधव आणि भूषण प्रधानयांची प्रमुख भूमिका असलेल्या ‘लग्नकल्लोळ’ या चित्रपटाचा जबरदस्त टिझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. टिझर पाहून प्रेक्षक या धमाकेदार चित्रपटाची आतुरतेने वाट पाहाणार, हे नक्की! या चित्रपटाच्या टिझरला प्रेक्षकांनी चांगलीच पसंती दिलीय. त्यामुळे लग्नकल्लोळ सुपरहिट होणार यात शंका नाही.टिझरमध्ये सिद्धार्थ सोबत मयुरी लग्नमंडपात दिसत आहे तर दुसऱ्या क्षणी भूषण मयुरीला लग्नाची मागणी घालताना दिसत आहे. यावरून मयुरी नक्की कोणासोबत लग्न करणार आणि हा काय ‘लग्नकल्लोळ’ सुरू आहे, याचे उत्तर प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच मिळणार आहे. चित्रपटात या प्रमुख कलाकारांसोबत अनेक दमदार कलाकार आहेत. हा लग्नाचा धमाका १ मार्चला उडणार आहे.मयुर तिरमखे फिल्म्स निर्मित या चित्रपटाचे, आण्णासाहेब रामचंद्र तिरमखे, मंगल आण्णासाहेब तिरमखे, डॉ. मयुर आण्णासाहेब तिरमखे निर्माते आहेत. तर मोहम्मद एस. बर्मावाला आणि डॉ. मयुर आण्णासाहेब तिरमखे दिग्दर्शित 'लग्न कल्लोळ' या चित्रपटाचे लेखन जितेंद्रकुमार परमार यांनी केले आहे.चित्रपटाबद्दल दिग्दर्शक, मोहम्मद बर्मावाला म्हणतात, " चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. लग्न म्हटले की घरात कल्लोळ हा आलाच. परंतु हा कल्लोळ जरा वेगळा आहे. यात ट्विस्ट आहे. हा कौटुंबिक चित्रपट असून प्रेक्षकांसाठी निखळ मनोरंजनाचा खजिना आहे."मयुरी देशमुख, सिद्धार्थ जाधव आणि भूषण प्रधानयांची प्रमुख भूमिका असलेल्या ‘लग्नकल्लोळ’ या चित्रपटाचा जबरदस्त टिझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. टिझर पाहून प्रेक्षक या धमाकेदार चित्रपटाची आतुरतेने वाट पाहाणार, हे नक्की! या चित्रपटाच्या टिझरला प्रेक्षकांनी चांगलीच पसंती दिलीय. त्यामुळे लग्नकल्लोळ सुपरहिट होणार यात शंका नाही.टिझरमध्ये सिद्धार्थ सोबत मयुरी लग्नमंडपात दिसत आहे तर दुसऱ्या क्षणी भूषण मयुरीला लग्नाची मागणी घालताना दिसत आहे. यावरून मयुरी नक्की कोणासोबत लग्न करणार आणि हा काय ‘लग्नकल्लोळ’ सुरू आहे, याचे उत्तर प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच मिळणार आहे. चित्रपटात या प्रमुख कलाकारांसोबत अनेक दमदार कलाकार आहेत. हा लग्नाचा धमाका १ मार्चला उडणार आहे.मयुर तिरमखे फिल्म्स निर्मित या चित्रपटाचे, आण्णासाहेब रामचंद्र तिरमखे, मंगल आण्णासाहेब तिरमखे, डॉ. मयुर आण्णासाहेब तिरमखे निर्माते आहेत. चित्रपटाबद्दल दिग्दर्शक, मोहम्मद बर्मावाला म्हणतात, " चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. लग्न म्हटले की घरात कल्लोळ हा आलाच. परंतु हा कल्लोळ जरा वेगळा आहे. यात ट्विस्ट आहे.

# विराट-जडेजाला मारण्याची धमकी!

## माजी क्रिकेटपटू डीन एल्गरचा धक्कादायक खुलासा

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार डीन एल्गरने या महिन्यात कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याने शेवटचा सामना भारताविरुद्ध खेळला होता. निवृत्तीला एक महिनाही उलटलेला नाही तोच त्यांनी वादग्रस्त विधान केले आहे. एल्गरने २०१५ च्या भारत दौऱ्याशी संबंधित धक्कादायक खुलासा केला आहे. मोहालीत खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीदरम्यान माजी कर्णधार विराट कोहलीने आपल्यावर थुंकल्याचा दावा त्याने केला आहे. एल्गरच्या या विधानामुळे नवा वाद निर्माण झाला आहे.**



दक्षिण आफ्रिकेचा संघ २०१५ मध्ये चार कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारत दौऱ्यावर आला होता. पहिली कसोटी मोहालीत खेळली गेली. भारताने हा सामना १०८ धावांनी जिंकला होता. त्याचबरोबर मालिका ३-० अशी जिंकली. पहिल्या कसोटीदरम्यान कोहली आपल्यावर थुंकल्याचा दावा एल्गरने केला आहे. कर्णधार म्हणून घरच्या मैदानावर कोहलीची ही पहिलीच कसोटी मालिका होती. एल्गरने अजून एक खुलासा केला की, त्याने कोहलीला धमकी दिली होती की, पुन्हा असे केल्यास तो त्याला बॅटने मारेल.एल्गरने यूट्यूब चॅनलवरील संभाषणात सांगितले की, “त्या मालिकेदरम्यान खेळपट्टीवरुन विनोद केले जात होते. रविचंद्रन अश्विनविरुद्ध फलंदाजी करताना मला लय कायम ठेवायची होती. त्यावेळी रवींद्र जडेजा आणि कोहली माझ्यावर थुंकले. मी त्यांना सांगितले की, जर त्यांनी असे पुन्हा केले तर मी त्यांना बॅटने मारेन.” यानंतर जेव्हा एल्गारला विचारण्यात आले की कोहलीला तुमची स्थानिक भाषा समजली होती का? यावर एल्गर म्हणाला की कोहलीला समजले होते. कारण एबी डिव्हिलियर्स आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाकडून खेळत होता.एल्गर पुढे म्हणाला, “हो, त्याला समजले होते. डिव्हिलियर्स आरसीबी संघात त्याचा सहकारी होता. मग मी म्हणालो की जर तू असे पुन्हा केलेस तर मी तुला या जमिनीवर ****, तुला इथेच आपटेन देईन. आणि मग तो म्हणाला **** (कोहलीची नक्कल करत), तुम्ही चुकीच्या ठिकाणी बोलत आहात. असो, आम्ही भारतात होतो त्यामुळे थोडं सावधही राहायचं होतं.” तथापि, एल्गरने याचाही खुलासा केला की जेव्हा भारतीय संघ २०१७-१८ मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेला होता तेव्हा कोहलीने ड्रिंक्स दरम्यान केलेल्या वर्तनाबद्दल माफी मागितली होती.एल्गर हा स्टार खेळाडू होता, पण त्याच्या खेळानुसार त्याला जसा सन्मान मिळणे अपेक्षित होते, तसा कधीच मिळाला नाही. या गोष्टीची खंत एल्गारच्या बोलण्यातूनही अनेकदा व्यक्त झाली आहे. २०१८ मध्ये, डीन एल्गरने आपली खंत व्यक्त करताना सांगितले की त्याने जे काही केले त्याचे त्याला जास्त श्रेय दिले जात नाही. इंडियन एक्स्प्रेसशी संवाद साधताना एल्गर म्हणाला होता की, “मी यापूर्वी जे काही केले त्याचे मला फारसे श्रेय दिले गेले नाही. माझ्या आणि दक्षिण आफ्रिकेच्या चाहत्यांमध्ये फार मोठे नाते आहे, असे मला वाटत नाही. बऱ्याच काळापासून, मी जे काही केले ते पलंगाखाली गाडल्यासारखे वाटले. प्रत्येक संघात माझ्यासारख्या क्रिकेटपटूंची गरज आहे, हे लोक विसरतात.”दक्षिण आफ्रिकेचा संघ २०१५ मध्ये चार कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारत दौऱ्यावर आला होता. पहिली कसोटी मोहालीत खेळली गेली. भारताने हा सामना १०८ धावांनी जिंकला होता. त्याचबरोबर मालिका ३-० अशी जिंकली. पहिल्या कसोटीदरम्यान कोहली आपल्यावर थुंकल्याचा दावा एल्गरने केला आहे. कर्णधार म्हणून घरच्या मैदानावर कोहलीची ही पहिलीच कसोटी मालिका होती. एल्गरने अजून एक खुलासा केला की, त्याने कोहलीला धमकी दिली होती की, पुन्हा असे केल्यास तो त्याला बॅटने मारेल.

### पुन्हा केले तर बॅटने मारेन

» एल्गरने यूट्यूब चॅनलवरील संभाषणात सांगितले की, “त्या मालिकेदरम्यान खेळपट्टीवरुन विनोद केले जात होते. रविचंद्रन अश्विनविरुद्ध फलंदाजी करताना मला लय कायम ठेवायची होती. त्यावेळी रवींद्र जडेजा आणि कोहली माझ्यावर थुंकले. मी त्यांना सांगितले की, जर त्यांनी असे पुन्हा केले तर मी त्यांना बॅटने मारेन.” यानंतर जेव्हा एल्गारला विचारण्यात आले की कोहलीला तुमची स्थानिक भाषा समजली होती का? यावर एल्गर म्हणाला की कोहलीला समजले होते. कारण एबी डिव्हिलियर्स आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाकडून खेळत होता.

# पराभवानंतर भारताला आणखी एक धक्का

## आयसीसीची जसप्रीत बुमराहवर मोठी कारवाई

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेला हैदराबादमध्ये सुरुवात झाली. २८ धावांनी विजय मिळवला होता. या सामन्यातील पराभवानंतर टीम इंडिया मालिकेत ०-१ ने मागे पडली. त्याचबरोबर, जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेतही नुकसान झाले. एवढेच नाही तर आता आयसीसीने भारताला आणखी एक धक्का दिला आहे. आयसीसीने अनुभवी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहवर कारवाई केली आहे.**

जसप्रीत बुमराहला इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीदरम्यान आयसीसीच्या आचारसंहितेच्या कलम २.१२ चे उल्लंघन केल्याप्रकरणी दोषी ठरवण्यात आले आहे. त्याच्या गुन्ह्याबद्दल त्याला अधिकृत फटकारण्यात आले आहे. ही घटना इंग्लंडच्या दुसऱ्या डावातील ८१ व्या षटकात घडली. बुमराहने जाणूनबुजून ऑली पोपच्या मार्गात अडथळा निर्माण केला होता. पोप जेव्हा एकेरी धाव घेण्यासाठी धावला, तेव्हा ही घटना घडली. त्यामुळे आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.१२ नुसार, जर एखादा खेळाडू दुसऱ्या खेळाडूशी किंवा अंपायरशी अनुचित शारीरिक संपर्कात आला



तर त्याला दोषी घोषित केले जाते. जसप्रीत बुमराहला आयसीसीने फटकारले आणि सोडून दिले. त्याला दंड ठोठावण्यात आला नाही, कारण २४ महिन्यांतील हा त्याचा पहिला गुन्हा होता. मात्र, आयसीसीने कारवाई करत त्याच्या रेकॉर्डमध्ये एक डिमेरिट पॉइंट जोडला आहे. मैदानावरील पंच पॉल रायफल, ख्रिस गॅफनी, तिसरे पंच मारेस इरास्मस आणि चौथे पंच रोहन पंडित यांनी हा आरोप केला होता. या सामन्यातील दुसऱ्या डावात सहा विकेट्स घेतल्या होत्या.ऑली पोप (१९६ धावा) च्या दमदमर शतकानंतर, नवोदित डावखुरा फिरकी गोलंदाज टॉम हार्टली (६२ धावांत ७ विकेट) याच्या जादुई स्पेलमुळे इंग्लंडने चौथ्या दिवशी भारतावर २८ धावांनी संस्मरणीय विजय मिळवला. त्याचबरोबर मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. इंग्लंडने भारतासमोर विजयासाठी २३१ धावांचे लक्ष्य ठेवले होते, मात्र हार्टलीच्या फिरकीच्या जाळ्यात अडकून यजमान संघ चौथ्या दिवशी दुसऱ्या डावात ६९.२ षटकांत २०२ धावांवर गारद झाला.रत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेला हैदराबादमध्ये सुरुवात झाली. २८ धावांनी विजय मिळवला होता. या सामन्यातील पराभवानंतर टीम इंडिया मालिकेत ०-१ ने मागे पडली. आणखी एक धक्का दिला आहे. आयसीसीने अनुभवी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहवर कारवाई केली आहे.

### भारताचा 28 धावांनी दारुण पराभव

» जसप्रीत बुमराहला इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीदरम्यान आयसीसीच्या आचारसंहितेच्या कलम २.१२ चे उल्लंघन केल्याप्रकरणी दोषी ठरवण्यात आले आहे. त्याच्या गुन्ह्याबद्दल त्याला अधिकृत फटकारण्यात आले आहे. ही घटना इंग्लंडच्या दुसऱ्या डावातील ८१ व्या षटकात घडली.